विपणन और प्रचार विभाग,
प्रधान कार्यालय, लोकमंगल
1501, शिवाजी नगर, पुणे 411 005
020- 25614324
media@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in;

**प्रसिद्धीसाठी**

**बँक ऑफ महाराष्ट्रचे सप्टेंबर 2019 च्या दुसऱ्या तिमाही आणि अर्धवर्ष समाप्तीचे आर्थिक निकाल**

**पुणे, ऑक्टोबर 22, 2019:** बँक ऑफ महाराष्ट्रच्या संचालक मंडळाने वित्तीय वर्ष सप्टेंबर 2019-20 दुसऱ्या तिमाही आणि अर्धवर्ष अखेरीचे आर्थिक निकाल आज बँकेच्या पुणे स्थित मुख्यालयी झालेल्या बैठकीमध्ये जाहीर केले. ही ताळेबंद खाती बँकेच्या वैधानिक लेखा परीक्षकांच्या लेखा परिक्षाधीन आहेत.

**<u>तिमाही लाभप्रदता</u>**

- बँकेचा निव्वळ नफा 30.09.2019 तिमाहीस वाढून तो रुपये 114.66 कोटी झाला. 30 सप्टेंबर 2018 च्या तिमाहीस रु 27 कोटीच्या वार्षिक तुलनेत हा नफा झाला आहे.
- 30 सप्टेंबर 2019 रोजी दुसऱ्या तिमाही समाप्तीमधील व्याजावरील उत्पन्न वाढून ते रु 2900.23 कोटी झाले आहे. ही वाढ गतवर्षीच्या याच काळातील उत्पन्नाच्या 4.02 टक्क्याने अधिक आहे.
- निव्वळ व्याजावरील उत्पन्नामध्ये 30 सप्टेंबर 2019 च्या दुसऱ्या तिमाही समाप्तीमध्ये रु 1073.37 कोटींची वाढ झाली असून गतवर्षीच्या याच काळातील उत्पन्नाच्या तुलनेत ही वाढ 7.03 % आहे. 30.09.2018 तिमाहीस निव्वळ व्याजावरील उत्पन्न रुपये 1002.86 कोटी होते.
- 30 सप्टेंबर 2019 च्या दुसऱ्या तिमाही समाप्तीस व्याजेतर उत्पन्न रु 395.65 कोटी इतके झाले आहे.
- 30 सप्टेंबर 2019 च्या दुसऱ्या तिमाही समाप्तीस कार्यान्वयन नफा रु 751.78 कोटी इतका झाला आहे.
- 30 सप्टेंबर 2019 च्या दुसऱ्या तिमाही समाप्तीस ठेवींवरील मूल्यदर घटून ते 4.91 % इतके झाले आहे. गतवर्षीच्या 30.09.2018 समाप्तीस हे मूल्यदर 5.03 % होते.
- 30 सप्टेंबर 2019 च्या दुसऱ्या तिमाही समाप्तीस निव्वळ व्याजामधील अंतर (नेट इंटरेस्ट मार्जिन) 2.77 % आहे.

**<u>अर्धवार्षिक लाभप्रदता</u>**

- 30 सप्टेंबर 2019 या अर्धवर्ष अखेरीस बँकेचा निव्वळ नफा वाढून तो रु. 195.78 कोटीं झाला आहे. ही वाढ गतवर्षीच्या अर्धवर्ष 30 सप्टेंबर 2018 अखेरीस झालेल्या 1092 कोटीं रुपये तोट्याच्या तुलनेत आहे.

- गतवर्षीच्या अर्धवर्ष 30 सप्टेंबर 2018 च्या तुलनेत व्याजावरील उत्पन्नामध्ये 30 सप्टेंबर 2019 या अर्धवर्ष अखेरीस 4.50 % ची वाढ होवून व्याजावरील उत्पन्न रुपये 5672.87 कोटी झालेले आहे.
- गतवर्षीच्या अर्धवर्ष 30 सप्टेंबर 2018 च्या तुलनेत निव्वळ व्याजावरील उत्पन्नामध्ये रुपयांची 30 सप्टेंबर 2019 या अर्धवर्ष अखेरीस 11.22 % वाढ होवून निव्वळ व्याज रुपये 2070.20 कोटी झाले आहे.
- गतवर्षीच्या अर्धवर्ष 30 सप्टेंबर 2018 च्या तुलनेत व्याजेतर उत्पन्नामध्ये 8.49 % वाढ होवून व्याजेतर उत्पन्न रुपये 814.94 कोटी झालेले आहे.
- 30 सप्टेंबर 2018 या अर्धवर्ष अखेरीस झालेल्या रु. 1264.88 कोटीं कार्यान्वयन नफ्याच्या तुलनेत 30 सप्टेंबर 2019 या अर्धवर्ष अखेरीस झालेला कार्यान्वयन नफा वाढला असून तो रुपये 1410.26 कोटी झाला आहे. ही वाढ 11.51 % आहे.
- निव्वळ व्याजामधील अंतर (नेट इंटरेस्ट मार्जिन) यामध्ये 30 सप्टेंबर 2019 च्या अर्धवर्ष समाप्तीस 2.68 % इतकी वाढ झालेली असून मागील वर्षी 30 सप्टेंबर 2018 या अर्धवर्ष अखेरीस हे अंतर 2.55 % इतके होते.

**व्यवसाय**

- बँकेच्या एकूण व्यवसायामध्ये वाढ झालेली असून 30.09.2019 रोजी एकूण व्यवसाय रु 2,32,846.74 झाला. 30.09.2018 रोजी एकूण व्यवसाय रु 2,26,068.86 कोटी होता.
- 30.09.2019 रोजी बँकेच्या एकूण ठेवींमध्ये वाढ झालेली असून या ठेवी रु 1,41,440.36 कोटी आहेत. 30.09.2018 रोजीच्या रुपये 1,35,525.94 तुलनेत असून वार्षिक आधारावरील ही वाढ रुपये 5,913.70 कोटी (4.36%) आहे.
- कासा ठेवी (बचत आणि चालू खात्यांमधील ठेवी) वाढून त्या रुपये 68,212.34 कोटी झाल्या आहेत. यामध्ये रुपये 5,537.52 कोटी इतकी वाढ झालेली आहे. 30.09.2018 रोजी याच ठेवी रुपये 62,674.82 कोटी इतक्या होत्या. वार्षिक आधारावरील ही वाढ 8.84 % आहे.
- एकूण ठेवींच्या तुलनेत कासा (बचत आणि चालू खात्यांमधील ठेवी) ठेवीचे प्रमाण 30.09.2019 रोजी 48.23 % आहे.
- 30.09.2018 रोजीच्या रुपये 90,542.20 कोटीच्या एकूण कर्जामध्ये वाढ होवून 30.09.2019 रोजी एकूण कर्जे रुपये 91,406.38 कोटी झालेले आहेत.

**मालमत्तेची गुणवत्ता (ॲसेट क्वालिटी)**

- 30.09.2018 रोजी एकूण थकीत कर्जे 16,872.84 कोटी (18.64%) च्या तुलनेत 30.09.2019 रोजी एकूण थकीत कर्जे रु 15,408.51 कोटी (16.86 %) झाली आहेत तर 30.06.2019 रोजी निव्वळ थकीत कर्जे 16,649.58 कोटी (17.90%) होती.

- 30.09.2018 रोजी रुपये 8,742.86 कोटी (10.61%) निव्वळ थकीत कर्जाच्या तुलनेत 30.09.2019 रोजी रु 4,406.56 कोटी (5.48 %) आहेत तर 31 मार्च 2019 रोजी बँकेची निव्वळ थकीत कर्जे 5.52% आणि 30 जून 2019 रोजी 4,856.27 कोटी (5.98%) होती.
- बँकेने सुदृढ संरक्षक तरतूद गुणोत्तर (हेल्दी प्रोव्हिजन कव्हरेज रेशो) राखले असून हे गुणोत्तर 30.09.2019 रोजी 82.71% आहे. गतवर्षी 30.09.2018 रोजी हे गुणोत्तर 64.37% होते. 31.03.2019 रोजी हे गुणोत्तर 81.49% तर 30.06.2019 रोजी 81.24% होते.

**<u>भांडवल पर्याप्तता</u>**

- भांडवल पर्याप्तता गुणोत्तरामध्ये 30.09.2019 रोजी 11.83 % वाढ झालेली असून 30.09.2018 रोजी हे गुणोत्तर 9.87% होते तर 30.06.2019 रोजी 11.69% होते.
- टायर-1 गुणोत्तर मध्ये वाढ होवून ते 30.06.2019 रोजीच्या 9.71% तुलनेत 30.09.2019 रोजी 10.01% झाले आहे.




**फोटोमध्ये:** बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए. एस. राजीव यांनी बँकेचे वित्तीय वर्ष सप्टेंबर 2019-20 च्या दुसऱ्या तिमाही आणि अर्धवर्ष अखेरीचे आर्थिक निकाल दिनांक 22 ऑक्टोबर 2019 रोजी बँकेच्या पुणे स्थित लोकमंगल मुख्यालयी जाहीर केले.

-------------------------------------------------------------------------------------------------------या पत्रकार परिषदेवेळी (डावीकडून) बँकेचे सरव्यवस्थापक श्री एन. रामबाबू, कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए. एस. राजीव, कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा आणि सरव्यवस्थापक श्री एन एस देशपांडे.

-------------------------------------------------------------------------------------------------------